------------------------------------------------------------------------------------------

नवरा रोज रात्री साखरेचा डबा उघडून पाहतो आणि मग झोपतो.

.

बायको : तुम्ही दर रात्री साखरेचा डबा उघडून का पाहता ?

.

नवरा : डॉक्टरनी रोज रात्री शुगर चेक करायला सांगितली आहे.

------------------------------------------------------------------------------------------

बाई : डॉक्टर साहेब, तुम्ही तर म्हणाला होता खेळल्याने वजन कमी होतं ?
पण माझं तर बिलकुल कमी नाही झालं.

डॉक्टर : बाई, तुम्ही कोणता खेळ खेळता?

बाई : कँडी क्रश.

------------------------------------------------------------------------------------------

नवरा बायको मध्ये कडाक्याचं भांडण होतं.
अर्धा दिवस चुपचाप बसून गेल्यावर बायको नवऱ्याजवळ येते आणि म्हणते,
"असं भांडण चांगलं नाही. एक काम करू - थोडं तुम्ही कॉम्प्रमाईझ करा,
थोडं मी करते.”
बिचारा भोळा नवरा म्हणाला, "ठीक आहे, काय करायचंय बोल."
बायको म्हणते, "तुम्ही माझी माफी मागा आणि मी तुम्हाला माफ करते."

------------------------------------------------------------------------------------------